# एसएनडीटीटीत स्त्रीविषयी भित्तीचित्रांचे प्रदर्शन



**मुंबई** : श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापिठाच्या इतिहास विभागाने 'आत्मनिर्भर भारतीय स्त्री' या विषयावर भित्तीचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक, मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य डॉ. रवींद्र शिसवे यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनातून ए. एम. इतिहास विभागाच्या विद्यार्थिनींनी आधुनिक काळातील भारतीय स्त्रीचा आतापर्यंतचा प्रवास, तसेच स्वातंत्र्य आंदोलन, इतर सामाजिक चळवळी आणि क्रीडा, कला, साहित्य, नाटक इ. क्षेत्रांना स्त्रियांनी दिलेल्या योगदानाचा परामर्श यातून घेण्यात आला आहे. डॉ. जास्वंदी वांबूरकर आणि डॉ. मेहेर ज्योती सांगळे यांनी भित्तीचित्रांचा परिचय प्रमुख पाहुण्यांना करून दिला. यावेळी विद्यापीठातील इतर मान्यवर उपस्थित होते. भविष्यात असे नावीन्यपूर्ण उपक्रम विभागातर्फे घेण्यात येतील, असा मानस इतिहास विभाग प्रमुख डॉ. वांबूरकर यांनी व्यक्त केला.